# शिवाजी महाराज व डच संबंध : एक अभ्यास

**प्रविण नारायण राठोड** संशोधक विदयार्थी, इतिहास विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मो. नं. ८६६८६९४६७९ Email: pr0854917@gmail.com

---

**सारांश**

हॉलंडमधील डच व्यापाऱ्यांनी भारताशी व पूर्वेकडील देशांशी व्यापार करण्यासाठी दि. २० मार्च १६०२ रोजी ईस्ट इंडिया कंपनी स्थापन केली. तसेच हॉलंडच्या सरकारकडून कंपनीस मॅगेलनच्या सामुद्रधुनीलगतच्या प्रदेशात आणि भारत आणि पूर्वेकडील देश जावा सुमात्रा ही बेटे यात व्यापार करण्यास व मालाच्या सुरक्षिततेसाठी वखारी व वखारी भोवती तटबंदी व सुरक्षा सैनिक ठेवण्यास, किल्ले बांधणी व जहाज बांधण्यास परवाना मिळाला. डच कंपनीने इ.स. १६१७ मध्ये बटेव्हिया शहराची उभारणी केली. तिथे वखार घातली. कालांतराने ते शहर त्यांच्या व्यापारी आणि राजकीय उलढालीचे केंद्र बनले. शिवाजी महाराज व डच संबंध अभ्यासताना शिवाजी महाराजांचे डच विषयक धोरण कसे होते, शिवाजी महाराजांच्या डच विषयक कारवाया यांचा अभ्यासही करावा लागतो. सदरील संशोधन पेपेर मध्ये शिवाजी महाराज व डच संबंधावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**उद्दिष्टे**

१) शिवाजी महाराजांच्या परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करणे.

२) शिवाजी महाराज व डच संबंधाचा आढावा घेणे.

**प्रस्तावना**

मॉरिस व फ्रेडरिक या हॉलंडच्या राजांनी डच ईस्ट इंडिया कंपनीस पुष्कळ जहाजे व व्यापारी सवलती दिल्या. डचांनी भारताच्या मलबार किनाऱ्यावर बऱ्याच ठिकाणी वखारी स्थापल्या व पोर्तुगीजांची नाविक सत्ता खूपच कमी केली. त्यांनी कारवार, वेंगुर्ला व सुरत येथे व्यापारी वखारी स्थापल्या. मोगल सत्ताधीशांशी संधान बांधून आग्रा, दिल्ली,अहमदाबाद, सुरत, राजापूर, वेंगुर्ला येथे त्यांनी वखारी व वकिलाती स्थापन केल्या. त्यांच्या जहाजावर तोफा, बंदूकधारी खलाशी असल्यामुळे त्यांना चोर, अपहरण, लुटालुटीचे तितकेसे भय नसे.मुस्लिम व इतर सत्ताधाऱ्यांना दारूगोळा विकणे हाही व्यापार त्यांचा चाले. इ. स. १६६० साली सात आठ लढाऊ जहाजे सुरत येथे येऊन त्यांनी बंदराची व शहरातील व्यापाऱ्यांची नाकेबंदी केली. डचांच्या परवान्याखेरीज कोणतेही जहाज सबंध किनाऱ्यालगतच्या समुद्रावर फिरकेनासे झाले. इतकी डचांनी दहशत बसविली. सन १६१६ मध्ये डच कंपनीचा एक अधिकारी पीटर व्हॅन डर गोयके यांनी शहाजहान बादशहाकडून व्यापारी सवलती मिळविल्या. इंग्रज कंपनीच्या पत्राप्रमाणे हिंदुस्तानातील बहुतेक मोक्याची ठिकाणी त्यांच्या ताब्यात होती. त्यांच्या सल्ल्याखेरीज कोणी फारसे काही करू शकत नव्हते. किनारापट्टीचा व्यापार व समुद्रावरील सत्ता बरेच वर्ष डच्यांच्या स्वाधीन होती. शिवाजी महाराजांचे आरमार बलिष्ठ होईपर्यंत डचांचे परवाने इतर व्यापाऱ्यांना माल पाठवताना आणताना घ्यावे लागत. त्यांना काही बंदरात जकात संपूर्ण माफ होती.

**शिवाजी महाराज व डच संबंध**

मराठयांचा डचांशी संबंध शहाजीराजांच्या कर्नाटक मोहिमेतून निर्माण झाला. इ. स. १६५७ साली संद्रेम पाटण शहर शहाजीराजेंनी घेतले. त्यावेळी तेथील डच वखार शहाजीराजांच्या सैनिकांनी लुटली व स्वतःच्या ताब्यात ठेवली आणि नोकरांना कैद केले. दि. १० जानेवारी १६६० रोजी शिवाजी राजेंनी राजापूर लुटले पण तेथे डच वखार नव्हती. १६ फेब्रुवारी १६६० रोजी नेमलेला वेंगुर्ल्याचा विजापुरी सुभेदार रुस्तुम जमा हा डचांचा मित्र होता. असे असले तरी डच कंपनीने इंग्रज व पोर्तुगीज यांच्यापुढे कशी बाजी मारली याचे वर्णन हेनरी रिविंगटनच्या दिनांक १० डिसेंबर १६५९ च्या पत्रात मिळते.[१] आमचे (इंग्रजांचे) व पोर्तुगीजांचे शत्रू डच लोक यांनी पोर्तुगीजांची या किनाऱ्यावर सर्वत्र दुर्दशा उडविली आहे. आम्हास कळते की, वेंगुर्ल्याच्या डचांनी विजापूर राणीला मोठी लाच भरून गोव्यावर सैन्य पाठविले होते. तिच्याकडेही गोवेकरांनी वकिला सोबत एक लक्षाचा नजराणा पाठविला. त्यामुळे तिने यावर्षी सैन्य पाठविण्याचे स्थगित केले. परंतु त्यांनी पुन्हा नजराणा भरून हा डाव उलटविला. इंग्रज व डच यांच्यात युद्ध उपस्थित होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. डचांजवळ पुष्कळ असे सैन्य नाही. परंतु लवकरच जमा करून त्यांनी विजापूरकरांशी संगनमत केल्यास ते गोवे घेऊ शकतील. परंतु रुस्तुमजमाने मनात आणल्यास व पोर्तुगीज लोक त्याच्याशी सढळ हातांनी वागतील तर डचांना मुसलमानी कुमक मिळणार नाही.[२] १० जानेवारी १६६० रोजी शिवाजी महाराजांनी राजापूर लुटले. परंतु तेथे डच वखार नव्हती. याचवेळी शिवाजी महाराजांनी वेंगुर्ल्याचे डच प्रेसिडेंट संदुलीक यांच्याकडे वकील पाठवण्याचा बेत केला आणि त्यांनीही एक स्वागतपर पत्र नजराणा आणि स्नेहाच्या अटीबद्दलचे पत्र महाराजांना धाडले.[३] इ.स. १६६३ मध्ये शिवाजी महाराजांनी कुडाळवर स्वारी केली.त्यावेळी वेंगुर्ले शहर व्यापाराच्या दृष्टीने मोठे भरभराटीस आलेले होते. कोल्हापूर कुडाळमार्गे ते कोकणाकडे निघाले आणि मे १६६३ मध्ये वेंगुर्ल्यास पोहोचले. शिवाजी महाराजांच्या ४००० स्वारांच्या घोडदळाने आणि १०,००० हजार सैनिकांच्या पायदळाने वेंगुर्ले आणि कुडाळ मधील रहिवाशांना भयभीत करून दहशत निर्माण केली. यावेळी डच लोकांनी समग्र कोकणपट्टी वेंगुर्ल्यापर्यंत आपल्या दहशतीखाली आणली होती. पोर्तुगीजांची जुनाट सत्ता त्यांनी खिळखिळी करून टाकली होती. डचांवर ताण बसविण्यासाठी शिवाजी महाराजांनी वेंगुर्ल्याच्या मागील कुडाळ, सावंतवाडी जिंकून घेतली.[४] डिसेंबर १६६४ च्या आरंभी वेंगुर्लेही लुटले. त्यानंतर महाराजांनी १६६५ च्या फेब्रुवारीत आपले ८५ शिवाडे व तेथील ३ मोठे गलबते असलेले आरमार बरोबर घेऊन

बसनुरची स्वारी स्वतः तारवांतून जाऊन केली. शिवाजी राजांची कृत्ये थक्क करणारी, बुद्धिमत्तेची द्योतक,त्यांचा मार्ग शोधणे फारच कठीण असे डचांचे मत होते.[५] शिवाजीचे आरमार कानडा प्रदेशात गेले आहे हे समजण्यास डचांना बरेच दिवस लागले. डच कंपनीचा रेसिडेंट कळवितो की, महाराजांना बसनूर मध्ये ३ लाख गिल्डरची खंडणी मिळाली.[६]

शिवाजी राजांनी मुंबई जिंकून घेण्यासाठी डचांना ३००० सैन्य द्यावे व त्याबद्दल सिद्धीची दंडराजपुरी घेण्यास डच लोकांनी शिवाजीला मदत द्यावी असा डच ॲडमिरल व गव्हर्नर रिकलॉफने करार केल्याची बातमी इंग्रजांना समजली.पण त्यांना शिवाजी संबंधी तितकीशी खात्री वाटेना. तरी पण ७ डच जहाजे मुंबईपासून जरा दूर अंतरावर नांगर टाकून राहिली होती. डचांशी पूर्ण संगनमत झाले असते तर इंग्रजांना मुंबईच काय पण सुरतेहून काढता पाय घ्यावा लागला असता असे मुंबई कन्सल्टेशन सांगते. कारवार येथे त्यांनी इ. स. १६६७ मध्ये वखार घातली. पण त्यास शिवाजीच्या लोकांनी त्रास दिला नाही. शिवाजीराजांचे मंत्री डचांना वेंगुर्ल्यास मित्रत्वाने वागवितात असे डच रेकॉर्ड ३१ जानेवारी १६७५ चे पत्र बोलते. शिवाजी राजे कर्नाटकात स्वारीवर गेले तेव्हा पुलिकतचे डच व फ्रेंच यांच्याकडून २ लक्ष होन प्रत्येकी मागितले.[७] देवनापटणचे डच मोठ्या थाटात शिवाजीराजांना भेटावयास आले. त्यांना महाराजांनी छावणीमध्ये २ महिने अडकवून ठेवले व त्यांच्याकडून बऱ्याच द्रव्याची प्राप्ती झाल्यावर सोडून दिले.[८] हिंदू राजे एखाद्या माणसाची योग्यता ठरवतात ती त्याचा बाणेदारपणा,रुबाब त्याचा बोलबाला, नावलौकिक, लोकप्रियता व श्रीमंती यावरूनच असे डच वकील हर्बर्ट डी जागर लिहितो.

तो पुढे लिहितो की, शिवाजी राजांचा खास तंबू (स्टेट टेन्ट) उभारलेला होता तो साधाच होता. जनार्दनपंत वकील व त्याचा भाऊ रंघुनाथ पंत यांना बरोबर घेऊन शिवाजीराजे तंबूत आले.[९] त्यानंतर डच कंपनीची मानवंदना शिवाजी राजे यांनी स्वीकारली व पूर्वी दिलेली आश्वासने तशीच चालू राहतील असे आश्वासन दिले. वकिलांनी आपल्या व्यापाराच्या हकीकती,माहिती, अडचणी, तक्रारी,गैरसोयी व चालू परिस्थितीची माहिती दुभाष्यामार्फत (वेंकटाजी) कळविली. ती ऐकून घेतली. पानसुपारी नजराणे झाले. डच वकील जाण्यास निघाले तेव्हा शिवाजीराजे यांनी गव्हर्नर जनरलला भेट म्हणून काही जिनसा जॅगरकडे देण्यास सांगितले. वकील जाता - येता त्यास शिवाजी राजांच्या घोडेस्वारांनी त्यास मानवंदना दिली. अशा रितीने राजे डचांना मोठा मान देत असत. शिवाजी राजांकडून कारोमंडल किनाऱ्यावर व्यापार करण्यास काही सवलती आणि अभयपत्र मिळाले. शिवाजी राजांचा वकील रघुनाथ नारायण हणमंते यांच्याकडून ज्यांना अभयपत्र मिळाले त्यात काही शर्ती पुढीलप्रमाणे होत्या -

१) जिंजी प्रांतावर व्यापार जकात शेकडा २ टक्के घेतात तितकी घ्यावी.
२) शिवाजी राजांच्या अधिकाऱ्यांनी पेटारे उघडून पाहून घ्यावी.
३) त्याकरिता आयात निर्यात माल कोणता याची माहिती अगोदर दिली पाहिजे.
४) डच कंपनीचे लोकांना प्रवास परवाने द्यावेत.
५) शिवाजीचे नौकर हवालदार वगैरे यांनी घेतलेल्या मालाची योग्य ती किंमत देऊन विकत घ्यावे.
६) जहाजे फुटल्यास सरकार जबाबदार नाही. गुलामांचा व्यापार करू नये.

पोर्टेमेहो येथील फ्रेंच व डच वखारवाले पैसे देत नाहीत म्हणून शिवाजी राजांच्या सैनिकांनी त्यांच्या वखारी लुटल्या होत्या. पण डच अधिकाऱ्याने शिवाजी राजांची गाठ घेऊन त्यांना १००० नजरांना दिला. बदाम, पिस्ते आधी जिन्नस भेट म्हणून दिल्या. तेव्हा वखारींना उपद्रव दिला जाणार नाही असे आश्वासन दिले गेले.[१०] वेंगुर्ल्याच्या प्रमुखास शिवाजीने पत्र लिहून चांगले सुरुंग उडविणाऱ्या लोकांची मागणी केली होती. यावरून शिवाजी राजे पाश्चात्यांची मदत कोणत्या प्रकारे घेत हे कळते. पण त्या लोकांकडे शिकण्यासाठी तरुण पाठविण्याचे उल्लेख मिळत नाहीत.पाश्चात्यापासून तोफा, बंदुका, दारुगोळा, औषधे शिवाजी राजे विकत घेत होते व ते गुप्तपणे या जिन्नसा शिवाजीला पूरवत. मोगल सत्तेला हे पाश्चात्य बाह्यता तरी भीत असत असे शिवकालीन पत्रव्यवहारावरून म्हणता येते. शिवाजी राजांच्या सैन्यात पोर्तुगीज नोकर तोफखाण्यावर असत. औरंगजेबाच्या तोफखान्यांमध्ये युरोपातल्या सर्व देशातल्या लोकांची भरती केलेली होती. शिवाजीची मुख्यता भिस्त घोडदळ आणि हात बॉम्ब बंदूकधारी पायदळ व तोफा यावर असे हे निर्विवाद आहे.गनिमी काव्याने शत्रूस बेजार करण्याचे त्यांचे धोरण होते. त्याला कुटयुद्ध असे म्हणण्यात येते. त्यामुळे पाश्चात्य देशीय शिवाजी राजांना वचकून असत.

अशा प्रकारे शिवाजी व डच संबंध दिसून येतात.

**निष्कर्ष**

१) शिवाजी महाराजांनी डचांशी मित्रत्वाचे व सौहार्दपूर्ण संबंध ठेवले.
२) शिवाजी महाराजांच्या डच विषयक धोरणातून त्यांच्या राजकीय मुत्सद्देगिरीचा प्रत्यय येतो.
३) शिवाजी महाराज व डच संबंधातून शिवाजी महाराजांच्या उत्कृष्ट आरमार व्यवस्थेचा प्रत्यय येतो.

**संदर्भ**

१) जोशी श. ना., शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड-१, श्री शिवचरित्र कार्यालय पुणे, १९३०, पृ. ७२१.
२) बाळकृष्ण, शिवाजी द ग्रेट, डी. बी, तारापूरवाला ॲंड सन्स, बॉम्बे,१९३८, पृ.९२.
३) जोशी श. ना, उपरोक्त पृ.२३०.
४) बाळकृष्ण, उपरोक्त पृ. ५०४, ५०५.

५) कित्ता, पृ. २५७.
६) कित्ता, पृ. ५१९.
७) बेंद्रे वा. सी., श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र (पूर्वार्ध व उत्तरार्ध) साहित्य सहकार मुद्रणालय, अलिबाग, १९७२, पृ.९६४.
८) कित्ता पृ.९८१.
९) खोबरेकर वि. गो., महाराष्ट्राचा इतिहास मराठा कालखंड भाग १ (शिवकाळ), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००६, पृ. १९८.
१०) कित्ता, पृ. १९९.